# सामाजिक प्रसार माध्यमांचा सामाजिक संस्थावरील प्रभाव

**प्रा.डॉ. बानायत जी.एच.**
शिवछत्रपती कला महाविद्यालय, पाचोड, ता.पैठण जि.औरंगाबाद

**प्रस्तावना :**

प्रसारमाध्यमे व्यक्तींच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. याला कुणीही उपवाद नाही वृत्तपत्रे, रेडीओ, टिव्ही, इंटरनेट चित्रपट यांच्या जोडीला अलिकडचा सोशल मिडीया सर्वांना आकर्षीत करत आहे. माध्यमांच्या सानिध्याशिवाय एक दिवस जात नाही असा एकही व्यक्ती शोधून सापडणार नाही. ही माध्यमे माहिती उपलब्धतेचे महास्त्रोत आहे. आज ग्रामीण भाग ते विदेशातील माहीती क्षणात मिळते आहे. माध्यमाच्या या कार्यामुळे समाज जीवन त्याकडे आकर्षीत झाले आहे. माध्यमाची समाजातील प्रभावशिलता अधिक आहे. त्यामुळेच प्रा.डेनिस मॅकेल माध्यमांना समाजाचे इंजिन असे संबोधले आहे. हे इंजिन म्हणजे ज्या दिशेला पळेल तिकडे त्याचे डब्बे म्हणजे समाज जाणार आहे. समाजातील चांगला वाईट बदल या माध्यमांची देणगी राहील.

मनुष्य हा सामाजशिल प्राणी आहे. संघ करुन राहणे, सहजीवन जगणे ही त्याची प्रवृत्ती आहे. त्यामुळे व्यक्ती परस्परांशी आंतक्रियात्मक संबंधाने जोडल्या जातात व समाजजीवनाची निर्मीती होते. समाजात राहिल्यामुळेच व्यक्तीला आपल्या असंख्य गरजांची पुर्तता करणे शक्य होते. सामाजिक संस्थांची निर्मिती ही व्यक्तीच्या गरजा भागवण्याचे कार्य करते. पण अलिकडे औद्योगिकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल साध्या अर्थव्यवस्थेतुन गुंतागुंतीच्या अर्थव्यवस्थेकडे झालेली दिसते. या अर्थव्यवस्थेच्या बदलाचा परिणाम सामाजिक संस्थेवर झालेला दिसतो. तसाच परिणाम उत्पादनावरही होईल पण हे देश हिताचे होणार नाही ते बाधक ठरेल. त्यामुळे प्रगतीस खिळ बसेल. सामाजिक संस्थांचा कार्यात परिवर्तनामुळे होणाऱ्या बदलाचा प्रामुख्याने त्यातील दोषाचा विचार आपल्याला प्राधान्य पुर्वक करावा लागणार आहे. माध्यमे आणि सामाजिक बदलासाठी त्यांची उपयुक्तता, याचा शोध घेताना या बाबींचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. सामाजिक बदलासाठी माध्यमे काय करु शकतात, माध्यमांच्या साहायाने सामाजिक बदल कसा घडून येईल ? या प्रश्नांसोबतच सहयोगी समाज रचनेत माध्यमांचा कसा उपयोग करता येईल. या प्रस्तुत शोधनिबंधात परामर्श घ्यावयाचे ठरविले आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तूत शोध निबंधाची माहिती दुय्यम स्त्रोतावर आधारीत आहे. संदर्भग्रंथ, संशोधन त्या आधारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे. वर्तमानपत्र, मासिके, प्रलेख, इत्यादीचा आधार घेण्यात आला आहे.

कनिष्ठ जातीतील कर्तृत्ववान व्यक्तींना संधी न मिळाल्यामुळे त्यांच्या गुणांचे चिज होत नाही. आर्थिकस्थिती व जीवनध्दतीत बदल न करु शकल्यामुळे ते उदासिन होत आहेत.

**प्रसारमाध्यमे आणि कुटुंबसंस्था :**

ग्रामीण भागात वाढत्या लोकसंख्या बरोबर पोषणाचा प्रश्न निर्माण झाला तसेच व्यवसायानुरुप कुटुंबाची आर्थिक शक्ती क्षिण होत गेल्याने पर्यायाच्या शोधात काही कर्तृत्ववान व्यक्तींना कुटुंबाबाहेर जावे लागले. गुंतागुंतीच्या अर्थव्यवस्थेत ग्रामीण भागाची स्वयंपुर्णता संपुष्टात येवु लागल्याने मानव यंत्राप्रमाणे गतीशिल झाला आहे. त्यामुळे कुटुंब संस्थेवर आघात होत गेले. सुस्थितीकडुन अस्थिरतेकडे कुटुंबाची वाटचाल सुरु झालेली आज दिसते आहे. त्यामुळे निवासस्थान, पाणी पुरवठा, वीज पुरवठा, आरोग्य सेवा, शाळा, कॉलेजस, इत्यादींवर विलक्षण ताण पडत आहे. त्यामुळे महागाईने उच्चांक गाठला आहे. म्हणुन घरातील स्त्रि पुरुषांना अर्थाजनासाठी घराबाहेर पडावे लागले आहे व लागणार आहे. अशा विस्कळीत कुटुंबाकडुन विधवा, वृध्द, अपंग, स्वत:ची मुले यांच्या जबाबदाऱ्या कसोशिने पार न पाडता येवु लागल्यामुळे नवे पर्याय उपलब्ध होत आहे. जसे पाळणाघर, वृध्दाश्रम की जे अनौपचारीकतेकडे घेवुन जात आहेत. कुटुंबाचे स्वरुप महानगरात एखादया विश्रामस्थान वा विश्रामधामा सारखे झाले आहे. एखादया बस डेपोतुन गाडया सुटाव्या वा त्यावर परताव्या तसे सकाळी बाहेर पडतात व सायंकाळी किंवा रात्री बाहेर परततात. असे चित्र

आज स्पष्ट दिसते आहे. त्यामुळे मुलांचे सामाजिकरणाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. आर्थिक संपन्नतेबरोबर सामान्यांच्या कुटुंबाव्दारे वडीलधाऱ्यांबद्दल आदर, कुटुंबीयांसाठी त्याग आदी मुल्य जोपासल्या जातील काय ? कुटुंबाची संस्कारक्षमता टिकेल काय ? असे प्रश्न आ वासुन आपल्या समोर उभे आहेत.

**प्रसारमाध्यमे आणि विवाहसंस्था :**

आज विवाहाच्या मुलभुत आधारात बदल झाला आहे. जगात अनेक समाजात धर्म हा विवाहाचा मुलाधार आहे. परंतु बदलत्या परीस्थीतीत कायद्याचा आधार घ्यावा लागत आहे. धार्मिक विधीचे महत्व कमी झाले आहे. १९५५ च्या विवाह कायद्यानुसार विवाहाची नोंदणी करणे अनिवार्य ठरले आहे. विवाहातील जोडीदार निवडीच्या पध्दतीत बदल झालेला आहे. शहरी—ग्रामीण, सुशिक्षीत, अशिक्षीत, उच्च—कनिष्ठ अशा सर्व स्तरांवर हुंडयाची देवाण घेवाण आजही आहे. प्रसंगी हुंडयासाठी स्त्रिला जाळुन मारण्याच्या घटना घडतात. विधवा पुनर्विवाहाला मान्यता हा भारतीय विवाह संस्थेतील महत्वाचा बदल आहे. घटस्पोटास मान्यता परंपरागत विवाह संस्थेत तत्वत: घटस्फोटास मान्यता नसली तरी काही अपवादात्मक परिस्थीतीमध्ये घटस्पोट मान्य करण्यात आला आहे. भारतीय समाजाच्या पारंपारीक जीवनात आंतरजातीय विवाहाला प्रचंड विरोध होता. आजही तो कायम आहे. विवाहबाहय लैंगीक संबंधांना प्रखर विरोध असे अशा संबंधातुन संतती जन्माला आली तरी तत्वत: त्याला समाज मान्यता मिळत नसे सध्याच्या काळात परीस्थिती पूर्वीचे निकष हळुवारपणे शिथिल होवू लागले आहेत ग्रामीण जीवनात आंतरजातीय विवाह घडून येत नसेल तरी शहरी भागात हे प्रमाण हळुवारपणे शिथिल होवू लागले आहेत ग्रामीण जीवनात आंतरजातीय विवाह घडून येत नसले तरी शहरी भागात हे प्रमाण हळूवारपणे वाढू लागले आहे. सहशिक्षणामुळे प्रेमविवाहाच्या संख्येत निश्चित वाढ झालेली दिसुन येते.

**प्रसारमाध्यमे आणि धार्मिक संस्था :**

वैज्ञानिक विकासाबरोबर धर्मासंबंधीचे तर्क सदोष होउ लागले आहेत. धर्माकडे बघण्याच्या दृष्टीकोन बुध्दीनिष्ठ बनु लागला आहे. विज्ञान व्यक्ती विकासासाठी जे कार्य करीत आहे ते धर्म नाही हा फरक भारतीय लोकांच्या मनात रुजू लागला आहे. वैज्ञानिक स्पष्टीकरणामुळे निसर्गातील अनेक गुढ स्पष्ट होउ लागल्याने लोकांचा पारंपारीक दृष्टीकोन बदलू लागला आहे.

भारतीय समाजातील काळ काहीसा व्यक्तीनिष्ठ आणि अधार्मिक बनु लागला आहेत्र धर्माचे स्वरुप दिखावू स्वरुपांचे होउ लागले आहे. औदयोगीक लोकशाही व्यवस्था धर्मनिरपेक्षता, शिक्षण प्रसार, नविन तत्रज्ञान,आधुनिक सुखसोयी यांसारख्या घटकांचा प्रभाव लोकजिवनावर पडु लागल्याने धर्म संमत व्यक्ती वर्तनाची पिछेहाट सुरु झाली आहेत्र वैज्ञानीक प्रगती आणि शास्त्रिय संशोधन यामुळे धार्मिक श्रदध्दांना आधार असलेले सृष्टि विषयक अज्ञान कमी होत जावून एक दिवस धर्म मानवी समाजापासून दुर होईल असे अनेकांना वाटु लागले आहे,

**प्रसारमाध्यमे आणि शिक्षण संस्था**

जागतीकरणाचे पिल्लू खाजगीकरण आहे. आणि शिक्षणही त्याच क्षेत्रात उतरले आहेत्र शिक्षणाशी संबंधित कोणतेही क्षेत्र घ्या सदयस्थिती काय ? गुरुकुल पध्दतीतील संस्कार व शिक्षण सोडा सध्याचा शिक्षणाचा कालावधी, क्लासेसची गरज व प्राबल्य छापिल प्रश्नोत्तरे अगदी के.जी. पासुन पी.जी. पर्यंत मेडिकल पर्यंतच्या प्रवेशासाठी डोनेशन, राखिव जागांची सक्ती अगदी प्रवेशापासुन प्राध्यपकाच्या नियुक्ती पर्यंत त्यामुळे शैक्षणिक खोळंबा होत आहेत शिक्षणातील राजकारणामुळे शैक्षणिक व्यवस्था ढेपाळत चालली आहे.

**प्रसारमाध्यमे आणि राज्य संस्था**

राजनिती विविध पक्षाची तत्व प्रणाली शासन व्यवस्था,नोकरशाही, न्यायसंस्था, आंतरराष्ट्रीय संबंध नविन कायदे करणे व त्याची अंमल बजावणी व सुरक्षा व्यवस्था इत्यादीचा साकल्याने वा एकरितरित्या विचार व्हावा कारण वरील पैकी कोणत्याही एक घटकाचा सुध्दा देशवासियांवर, आम जनतेवर वा व्यक्तीवर परिणाम होत असतो. त्यामुळे सामाजिक आंतरक्रिया वा सामाजिक संस्था प्रभावित होते अपरीहार्य आहे. परंतु वर्तमानपत्र उघडले, रेडिओ वा दुरदर्शन सुरु केले वाचावयास वा ऐकावयास मिळते जनसामान्यांना चक्रावून टाकणारे असते. भ्रष्ट्राचाराचा विळखा समा.

जव्यवस्थेला पोखरुन टाकत आहे मजा तर अशी की कुंपणच शेत खाउन टाकते आहे काय वाटावे अशी आजची स्थिती आहे कायदे करणारेच कायदयात उणिवा कशा राहील असे बघतात.

**निष्कर्ष :**

बाहय जगाशी भारताचा गेल्या सुमारे पन्नास वर्षात जसजसा संपर्क वाढत गेला तसतसे आपल्या सामाजिक जिवनाचा चेहर मोहरा बदलत गेला आहेत. भारतीय पारंपारिक जीवन पध्दतीपासुन दुर न्यावयास भौमितीक पध्दतीने वाढणारया लोकसंख्याने लक्षणिय मदत केली असल्याची मान्य करावेच लागेल. परिणामी प्रतयेक संस्थेअंतर्गत व भिन्न संस्थांच्या पारंपारीक संबंधामुळे नानाविध समस्या निर्माण झाल्या आहेत. जात धर्म, आप्त संबंध इत्यादी बाबतीत दोष दुर करण्याच्या नावा खाली उलटया दिशेने म्हणजे भावनिक पातळीवर.द्वेष द्रढमुल करण्याचेच प्रयत्न प्रकर्षाने जाणवत आहे. अनैतिकता वाढत आहे. लाचलुचपत, भ्रष्टाचार, अनैतिक गैरमार्गाचा अवलंब नेत्याकडुन मक्तेदारी व अहीतकरीक बाबींना कायदेशीरपणा प्राप्त करुण देण्यास प्राधान्य इत्यांदी मुळे स्वातंत्रयोत्तर काळात आपण काय मिळ. विले विनाशाकडे चाललो का आदि प्रश्न उभे आहेत. त्यामुळे जागतिक पातळीवर आर्थिक धोरणातील परीवर्तन भारतीय समाजाला पेलवेल का या सारखे प्रश्न निर्माण होणे स्वभाविकच आहे. परंतू आपण परीवर्तन टाळू शकू का याचा तुलनात्मक विचार करावयास हवा. परीवर्तन पेलण्यास पोषक व मारक घटकांचा संतुलीत विचार करावया हवा.

**संदर्भ :**

१. प्रसारमाध्यमे आणि सामाजिक बदल : डॉ. सुधीर भटकर व डॉ.नितीन निताळे
२. Indian Express,Oct-1996
३. समकालीन भारतीय समाज : जोशी
४. जगतिकरणानंतरचे जग लेख: गजानन खोत